The commission's recommendation is prepared in this matter i.e file No CR-164/2015 and placed on flag 'A' for concurrence.

3/8/2015
A. N. Tripathi
Secretary
MSCPCR

Chairman (Incharge)
4/8/15

9/39
1979

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग समोर
बाल हक्क संरक्षण कायदा कलम 13(1) व 14 अंतर्गत चौकशी
प्रकरण क्र. 164 / 2015–16

कु. अश्विनी कांबळे ..... अर्जदार

विरुध्द

श्रीमती शोभा रमेश कांबळे ..... प्रतिवादी

पार्श्वभूमी

सदर प्रकरणी कु.अश्विनी कांबळे यांनी आपल्या आईच्या विरोधात आयोगाचे पुढे तक्रार दाखल केली. त्यांनी तक्रारीत असे नमूद केले आहे की, त्यांची आई त्यांची दोन्ही बहिणींची लहानपणापासून देखभाल करीत नाही व मदत करीत नाही. अर्जदारांच्या वडिलांचे निधन 2006 साली झाले त्या आधी पाच वर्षांपासून तक्रारदारांची आई हि वडिलांपासून वेगळी राहत होती नंतर ती परदेशात गेली व तक्रारदार व त्यांची बहिण त्यांच्या मावशी कडे राहत होती व मावशीने लहानपणा पासून त्यांचा सांभाळ केला आहे. तक्रारदार यांनी आपल्या आईच्या विरोधात बरेच मुद्दे तक्रारीत उपस्थित केले आहेत व असे सुध्दा नमूद केले आहे की, त्या कधी काहि खर्च देत नाहीत व त्यांची आई त्यांच्या व्यसनाधीन मामांच्या सांगण्यावरुन मोबाईल वरुन दोघी बहिणींना शिविगाळ करतात. आयोगाने हे प्रकरण दिनांक 30 ऑगस्ट, 2015 रोजी सुनावणी साठी ठेवले. सुनावणी दिवशी तक्रारदार, त्यांची आई व मावशी उपस्थित होत्या. तक्रारदारांनी त्यांचे वय 18 वर्षे पूर्ण नाही असे नमूद केले. तक्रारदाराच्या आईने आयोगासमोर असे म्हटले की, त्या आपल्या मुलींची देखभाल करतात. त्यांचे करिता परदेशात राहिल्या होत्या. सर्व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अशी बाब उपस्थित होते की हे प्रकरण कौटुंबिक समस्येचे असल्यामुळे समुपदेशनाची गरज आहे. म्हणून आयोग खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे.

1. जिल्हा बाल परिविक्षा अधिकारी, मुंबई शहर यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी तक्रारदारांना व गैरअर्जदारांना वेळ देऊन त्यांचे समुपदेशन करण्यात यावे व अहवाल आयोगास सादर करण्यात यावा. प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा शिक्का व हुकुमावरुन

14.8.2015
(अ.ना.त्रिपाठी)
भा.व.से.
सचिव
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

14 AUG 2015